| Article Date | Headline / Summary | Publication |
|---|---|---|
| 22 Jul 2024 | Need insurance cover for cars in monsoon! | Kesari |

# मॉन्सूनमध्ये मोटारीसाठी हवे विमा कवच!

मान्सूनमध्ये वर्षा सहलीचे अनेकांना वेध लागतात. पावसात मनमुराद भिजण्याचे स्वप्न असते. तसेच पावसाळ्यात सुलभपणे ड्रायव्हिंग करण्यासाठी तुमच्या मोटारीचे योग्य संरक्षण होणे महत्त्वाचे ठरते. पावसाच्या पाण्यापासून मोटारीचे होणारे नुकसान टाळण्यासाठी विशिष्ट विमा संरक्षणाची गरज असते. त्यासाठी विविध विमे उपलब्ध आहेत. ते खालीलप्रमाणे आहेत.

**इंजिन प्रोटेक्शन कव्हर** : पावसाच्या पाण्याच्या मोटारीच्या इंजिनावर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो. जर तुम्ही पाणी साचलेल्या भागातून वारंवार मोटार चालवत असाल. तर इंजिनमध्ये पाणी घुसण्याची शक्यता असते. त्यामुळे अपरिमित हानी होऊ शकते. यासाठी कदाचित स्टँडर्ड कार इन्श्युरन्स पॉलिसी तुम्हाला दिलासादायक ठरणार नाही. अशा स्थितीत इंजिन प्रोटेक्शन कव्हरची खास रचना करण्यात आली आहे. यात ॲड-ऑन कव्हरमुळे पाणी घुसल्यामुळे किंवा हायड्रोस्टॅटिक लॉकमुळे इंजिन आणि त्याच्या पार्टच्या दुरुस्ती किंवा बदलीसाठी येणाऱ्या खर्चास संरक्षण प्रदान केले जाते.

**झिरो डेप्रीसिएशन कव्हर** : मोटार असो की अन्य कोणत्याही वस्तू यांचे काळानुसार मूल्य घटत असते. ज्याप्रमाणे वय वाढते. त्याप्रमाणे मोटारीची किंमत कमी होत जाते. पावसाळ्यात निसरडे रस्ते आणि कमी दृश्यमानता यामुळे अपघातांच्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते. अशावेळी जेव्हा विमा दाव्याची वेळ येते, तेव्हा स्टँडर्ड इन्श्युरन्स पॉलिसी केवळ बदललेल्या पार्टसाठीच तुम्हाला हितकारक ठरते. ज्यामुळे तुम्हाला अपेक्षेपेक्षा कमी भरपाई मिळते. याउलट, झिरो डेप्रीसिएशन कव्हर हे घटणारे मूल्य विचारात न घेता कपातविना बदललेल्या नुकसान ग्रस्त पार्टसाठी तुम्हाला संपूर्ण खर्च प्राप्त होण्याची हमी देते.

**रोडसाइड असिस्टन्स कव्हर** : पावसाळ्याच्या स्थितीत ब्रेकडाउन



सुभाशिष मुझुमदार
मोटर डिस्ट्रिब्युशन प्रमुख,
बजाज आलियान्झ जनरल इन्श्युरन्स

किंवा अपघातामुळे रस्त्यामध्ये अडकून पडण्याची शक्यता सर्वाधिक असते. रोडसाईड असिस्टन्स कव्हरमुळे तुम्हाला केवळ एका कॉलद्वारे आवश्यक सेवा तत्काळ उपलब्ध होतात. या ॲड-ऑनच्या माध्यमातून टोईंग, फ्युएल डिलिव्हरी, बॅटरी जम्प-स्टार्ट आणि स्पॉटवर लहान दुरुस्ती यासारख्या सेवा थेट उपलब्ध केल्या जातात.

**कंझ्युमेबल कव्हर** : जलमय रस्ते आणि अतिवृष्टीमुळे तुमच्या मोटारीतील उपभोग्य (कंझ्युमेबल) वस्तूंचे वारंवार नुकसान होऊ शकते. ज्यामध्ये इंजिन ऑइल, ब्रेक ऑइल, लुब्रिकेंट, नट्स आणि बोल्ट्स आणि अन्य बाबींचा समावेश होतो. स्टँडर्ड इन्श्युरन्स पॉलिसी या उपभोग्य (कंझ्युमेबल) वस्तूंच्या नुकसान खर्चास कव्हर करत नाहीत. कंझ्युमेबल कव्हरद्वारे मात्र वस्तू बदलणे असो किंवा त्यास पुन्हा कार्यरत करणे यासाठी लागणाऱ्या खर्चास निश्चिततपणे कव्हर केले जाते. जेणेकरुन मान्सून दरम्यान संभाव्य अतिरिक्त खर्चापासून तुम्ही चिंतामुक्त राहू शकता.

**टायर प्रोटेक्शन कव्हर** : मान्सून काळात रस्त्यावर खड्डे पडण्याची शक्यता अधिक असते. ज्यामुळे टायरला नुकसान होण्याचा धोका नाकारता येत नाही. टायर प्रोटेक्शन कव्हर द्वारे कट, फुटणे किंवा फुगणे यामुळे होणाऱ्या टायर नुकसानीच्या स्थितीत टायर दुरुस्ती किंवा टायर बदलण्याच्या खर्चासाठी कव्हरेज प्रदान केले जाते.

तुम्ही मान्सूनसाठी सज्ज होत असताना, तुमच्या मोटारीच्या संरक्षणासाठी विधायक पावले उचलणे महत्त्वाचे आहे. सध्या इन्श्युरर इलेक्ट्रिकल आणि मेकॅनिकल ब्रेकडाउन (अपघाती नुकसान व्यतिरिक्त), कपातयोग्य वजावट यासारखे विविध अंतर्भूत वैशिष्ट्यांचा समावेश असलेले ॲड-ऑन्स देखील ऑफर करतात. विमाधारकाला अन्य वैशिष्ट्यांसह एकाच वेळी (पॉलिसी कालावधीदरम्यान) एकाधिक नुकसान/हानी रिपोर्ट करण्याची संधीची लवचिकता प्रदान करतात. यामुळे तुम्हाला केवळ आर्थिक संरक्षणच मिळत नाही, तर तुम्हाला मान्सून दरम्यान आत्मविश्वासाने प्रवासाची हमी देखील मिळते. योग्यपणे संरक्षित मोटार ही मान्सूनचा सुरक्षित आणि चिंतामुक्त आनंद लुटण्याची गुरुकिल्ली ठरते.